# रायगड जिल्हा पोलीस

## माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ (ख) अन्वयेची माहिती

---

**कलम ४(१)ख(I)**

| | |
|---|---|
| कार्यालाचे नाव | :- पोलीस अधिक्षक कार्यालय रायगड अलिबाग |
| पत्ता | :- हिराकोट तलावाजवळ अलिबाग जिल्हा रायगड, पिन ४०२२०१ |
| पोलीस अधीक्षक | :- श्री. अनिल पारस्कर |
| वास्तव मालमत्ता | :- राज्य सरकारने पुरविलेली शासकीय इमारत |
| कोणत्या खात्यांर्गत कार्यालय आहे | :-गृह विभाग,पोलीस महासंचालक ,म.रा.मुंबई |
| कार्यकक्ष/भौगोलीक | :- रायगड जिल्हयात येणारी २८ पोलीस ठाणे |
| अंगीकृत व्रत | :-"ध्येयवचनै |

रायगड पोलीस कायदयाचे राज्य अबाधित राखील,कायदयाची ठाम व निपक्षपातीपणे अंमलबजावणी करील प्रगती व समृध्दीसाठी पोषक असे भयमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी कटीबध्द राहील.

सार्वजनीक सुव्यवस्था राखण्यासाठी बांधील राहून गुन्हयाचा प्रतिबंध करुन त्याचा तत्परतेने शोध लावेल. जातीय सलोखा राखून तो वृध्दीगत करील आणि समाज विघातक प्रवृती व अवैध कृत्याविरुध्द कठोर कारवाई करेल.

आम्ही समाजातील सर्व घटकांची आणि विशेषता दलीत,दुर्बल स्त्रिया, अल्पसंख्यांक, गरीब आणि वंचीत घटकांची मनोभावे सेवा करु व त्यांना उचित संरक्षण प्रदान करुन आपत्तीग्रस्त नागरीकांचे हाके स ख-या सेवाभावी वृ-तीने व सहदयतेने तत्पर प्रतिसाद देवू.

आम्ही आमचे वैयक्तीक जिवनात उच्च प्रतीच्या सचोटीने आचरण करु पोलीस दलास भ्रष्टाचार मुक्त व पारदर्शी करण्यासाठी सतत प्रयत्नशिल राहू.

संरक्षीत व सुखकर रायगड हा आमचा संकल्प.हा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साद्य करु

| | |
|---|---|
| ध्येय/धोरण | :- सद्रक्षणाय खलनिग्रहणाय<br>कायदा व सुव्यवस्था अबाधितराखणे<br>शासनाने निर्धारीत के लेल नियम/आदेश/सुचनांचे पालन |
| साध्य | :- जनतेचे जिवीत व मालमत्तेचे रक्षण |
| प्रत्यक्ष कार्य | :- शासनाने ठरवून दिलेले कामकाज,कायदा व सुव्यवस्था, सुरळीत वाहतुक,गुन्हे प्रतिबंध,गुन्हे शोध सामाजिक सुरक्षा |